पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
लेखा विभाग
दूरध्वनी:- (०२०) ६७३३३३३३
E-mail :account@pcmcindia.gov.in Website : www.pcmcindia.gov.in

क्र. लेखा/घबां/२५/कावि/ 6003 २०२२ दि. /०५/२०२२ 25/07/2022

परिपत्रक

विषय:- नवीन घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्राचा आयकर सवलतीकामी एकदाही लाभ न घेतलेल्या कर्मचाऱ्यांसाठी देण्यात येणाऱ्या आयकर सवलत व्याज प्रमाणपत्राबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेवरील ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी नवीन घरबांधणी अग्रीम घेतलेले आहे परंतु त्यांनी सदरचे अग्रीम घेतल्यापासून संपूर्ण मुद्दल व व्याज वसुलीच्या कालावधीत अद्याप एकदाही नवीन घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्राचा लाभ घेऊन आयकर सवलत घेतलेली नाही अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून संबंधितांना आयकर सवलत मिळण्यासाठी आर्थिक वर्षनिहाय स्वरुपात नवीन घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले जाणार आहे याची सर्वसंबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून स्पष्टपणे नोंद घेण्यात यावी व सदरची बाब आपले अखत्यारीतील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावी. सदरचे परिपत्रक हे मनपा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे व सर्व संबंधित विभागांना ई-मेल द्वारे पाठविण्यात आलेले आहे.

<u>अटी व शर्ती खालीलप्रमाणे</u>:

१. सदरचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना सोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

२. असे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधितांचे सेवापुस्तक व वैयक्तिक नस्तीची पडताळणी करून सोबतचे प्रपत्र ब प्रमाणे लेखा विभागाकडे ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करणे आवश्यक राहील. (**संबंधित कर्मचारी यांनी प्रपत्र अ मध्ये सादर केलेला अर्ज लेखा विभागाकडे पाठविणेत येऊ नये. <u>संबंधितांनी प्रपत्र अ प्रमाणे सादर केलेला अर्ज संबंधित कर्मचारी यांचे वैयक्तिक नस्तीत ठेवणेत यावा</u>.**)

३. तसेच, संबंधितांनी आयकरविषयक प्रमाणपत्राद्वारे घरबांधणी व्याज आयकर सवलतीचा लाभ घेतल्याच्या नोंदी व तत्सम माहिती ही संबंधितांचे सेवापुस्तक व वैयक्तिक नस्तीत जतन करून ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी ही सर्वसंबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

४. सदरचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जात सादर करण्यात आलेली कोणतीही माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे आढळल्यास, त्यासाठी संबंधित कर्मचारी आणि आहरण व संवितरण अधिकारी हे सर्वस्वी जबाबदार असतील व सक्षम नियामक प्राधिकरण अथवा आयकर विभागाकडून केल्या जाणाऱ्या कारवाईस ते स्वतः पात्र असतील.

५. सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे विहित नमुन्यात व A4 आकाराच्या पेपरवर प्राप्त न झालेले अर्ज दप्तरी दाखल केले जातील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

टीप:- सदरचे प्रपत्र अ प्रमाणे अर्ज सादर करताना अर्जातील १ किंवा २ पैकी जी बाब लागू नाही ती वगळणेत यावी.

प्रपत्र अ

कर्मचाऱ्याचे नाव
विभाग व पत्ता
दिनांक

प्रति,

मा. ..................
...................... विभाग
........................ कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
.......-४११.....

विषय:- सन २०.....-२०..... या आर्थिक वर्षाकरिता आयकर सवलत मिळणेकामी नवीन घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्र मिळणे

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मी श्री./श्रीम. ................................................ आपणांस सविनयपुर्वक विनंती अर्ज सादर करतो की, मला आपले मनपाकडून आदेश क्र. ........................................ दि. ..../..../...... अन्वये र.रु. ................../- इतके नवीन घरबांधणी अग्रीम मंजूर झालेले असून र.रु. ..................../- इतके नवीन घरबांधणी अग्रीम प्रदान करण्यात आलेले आहे.

१. सद्यस्थितीत माझे वेतनातून नवीन घरबांधणी अग्रीम मुद्दलाची संपूर्ण वसुली झालेली असून व्याज वसुली सुरु आहे.
२. सद्यस्थितीत माझे वेतनातून नवीन घरबांधणी अग्रीम मुद्दलाची व व्याजाची संपूर्ण वसुली झालेली आहे.

तथापि, असे असले तरीही, मी नवीन घरबांधणी अग्रीम घेतल्यापासून आजतागायत एकदाही घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन आयकर सवलतीचा लाभ घेतलेला नाही.

तरी, मला सन २०.....-२०..... या आर्थिक वर्षाकरिता आयकर सवलत मिळणेकामी माझे सेवापुस्तक व वैयक्तिक नस्तीची पडताळणी करून घेऊन नवीन घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्र मिळण्यासाठी लेखा विभागाकडे स्पष्ट शिफारस करावी ही विनंती.

आपला / आपली विश्वासू,
स्वाक्षरी
संपूर्ण नाव

उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

# प्रपत्र ब

कार्यालयाचे नाव
विभाग व पत्ता
जा क्र. व दि.

प्रति,

मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

विषय:- सन २०.....-२०..... या आर्थिक वर्षाकरिता आयकर सवलत मिळणेकामी नवीन घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्र मिळणेबाबत...

संदर्भ:- श्री./श्रीम. यांचा दि. ../.. /२०.. रोजीचा विनंती अर्ज.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये श्री./श्रीम. ........ यांनी सन २०..-२०..या आर्थिक वर्षाकरिता आयकर सवलत मिळणेकामी घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्र मिळणेबाबत इकडील कार्यालयास उक्त संदर्भान्वये विनंती अर्ज सादर केलेला असून सदर विनंती अर्जात त्यांनी घरबांधणी अग्रीम घेतल्यापासून आजतागायत एकदाही घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन आयकर सवलतीचा लाभ घेतलेला नाही असे नमूद केलेले आहे.

श्री./श्रीम. ........ यांनी उक्त संदर्भान्वये केलेल्या विनंती अर्जास अनुसरून, त्यांचे सेवापुस्तक व वैयक्तिक नस्तीची पडताळणी केली असता, त्यांनी आदेश क्रमांक प्रशा/....../कावि/......../२०.. दिनांक ../../२०.. अन्वये र.रु. ....../- इतके नवीन घरबांधणी अग्रीम मंजूर झालेले असून र.रु. ....../- इतके नवीन घरबांधणी अग्रीम प्रदान करण्यात आलेले आहे.

अ. श्री./श्रीम. ........ यांचे माहे .....२०.. अखेर नवीन घरबांधणी अग्रीमावरील मुद्दलाची संपूर्ण वसुली झालेली आहे. श्री./श्रीम. ........ यांचे सद्यस्थितीत त्यांचे नवीन घरबांधणी अग्रीमावरील व्याज आकारणी माहे ..... २०..... पासून सुरु झालेली आहे.

आ. श्री./श्रीम. ........ यांचे माहे .....२०.. अखेर नवीन घरबांधणी अग्रीमावरील मुद्दलाची व व्याजाची संपूर्ण वसुली झालेली आहे.

श्री./श्रीम. ........ यांचे सेवापुस्तक व वैयक्तिक नस्तीची पडताळणी केली असता, त्यांनी घरबांधणी अग्रीम घेतल्यापासून आजतागायत एकदाही घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन आयकर सवलतीचा लाभ घेतलेला नाही.

सबब, उक्त नमूद बाबी विचारात घेऊन श्री./श्रीम. ........ यांना सन २०..-२०..या आर्थिक वर्षाकरिता आयकर सवलत मिळणेकामी नवीन घरबांधणी अग्रीम रक्कमेवरील व्याज प्रमाणपत्र मिळण्यासाठी इकडील कार्यालयाकडून स्पष्ट शिफारस करण्यात येत आहे.

उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

आहरण व संवितरण अधिकारी
शिक्का व दिनांकित स्वाक्षरी

टीप:- १. उक्त प्रपत्र ब प्रमाणे अर्ज सादर करण्यापूर्वी अर्जातील अ किंवा आ पैकी जी बाब लागू नाही ती वगळण्यात यावी.
२. विहित नमुन्यात नसलेले अर्ज विचारात न घेता ते दप्तरी दखल केले जातील व त्याबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही.

D:/pcmckas/circular/issued for those Officers and employees have never taken advantage of the HBA interest certificate for income tax relief. /